REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १३ सप्टेंबर, १९४४ अंक ३७

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### पुणें शहर

**मांडवल :**

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें मांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. म. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. विं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमूख

: शाखा :

पुणें ४, लष्करी, दलाल स्ट्रीट, ( मुंबई ),
गिरगांव ( मुंबई ), जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल | ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें मांडवल | ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... | रु. १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेद्दिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिल्लकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

## विविध माहिती

### हिंदी गिरण्यांसाठी ब्रिटिश यंत्रसामुग्री

युद्धसमाप्तीनंतर ५ ते १० वर्षांचे अवधींत हिंदी कपास गिरण्यांना नवे माग व जुन्या चात्या ह्यांचे जागीं नवे माग व चात्या लागतील, त्यांची मागणी १ कोटि चात्या व २ लक्ष माग एवढी प्रचंड होईल. इतराहि बरीच यंत्रसामुग्री त्यांस लागेल. लँकेशायर, हिंदुस्थान, डच इंडीज व चीन ह्यांस लागणारी ही यंत्रसामुग्री योग्य मुदतींत तयार करून पुरविणें इंग्लंडला कठीण जाईल. तेव्हां, सर्वांनी खरेदी बाबत धोरण आखण्याची संयुक्त योजना आखणें आवश्यक आहे व त्या बाबत ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें पुढाकार घ्यावा, असें "मँचेस्टर गार्डियन" पत्राला एका लेखकानें सुचविलें आहे.

### रेशनच्या मालाबाबत सरकार व कॉर्पोरेशन ह्यांत वांधा !

कलकत्ता शहरांतील रेशनचें धान्य खराब असल्याबद्दल तक्रारी आल्यामुळें कलकत्ता कॉर्पोरेशननें रेशनच्या दुकानांतील मालाचे नमुने तपासून खराब माल विकणारांवर खटले भरण्याबद्दल आपल्या इन्स्पेक्टरांस सूचना दिल्या आहेत. कलकत्ता कॉर्पोरेशनच्या आरोग्य खात्याच्या कोणत्याहि अधिकाऱ्यांस रेशनच्या दुकानदारांनीं रेशनच्या मालाचे नमुने देतां कामा नयेत असा हुकूम प्रांतिक सरकारच्या रेशनिंग खात्यानें काढला आहे. ह्या संबंधांत प्रांतिक सरकारचें रेशनिंग खातें व कलकत्ता कॉर्पोरेशन ह्यांच्यामध्यें चांगलाच वांधा येण्याचा संभव आहे, असें कलकत्त्याच्या नगराध्यक्षांनीं नगरपालिकेच्या सभेंत नुकतेंच सांगितलें.

### जुन्या गिऱ्हाइकांचा संतोष अमोदर

एखादें गिऱ्हाइक दुकानदाराचें जुनें व खरें गिऱ्हाइक नसेल, तर त्यास बीर विकण्याचें नाकारण्याचा अधिकार बीरच्या दुकानदारांस देण्यांत आला आहे. जुन्या गिऱ्हाइकांची मागणी व्यवस्थेशीर भागविल्यानंतरच इतरांस बीर मिळूं शकेल. जुन्या बाटल्या परत न देणाऱ्या गिऱ्हाइकांस बीर नाकारण्याचा अधिकारहि त्यांस आतां मिळाला आहे.

### हाडांच्या सांगाड्यांची निर्गत शक्य आहे

कांहीं वर्षांपूर्वी, हिंदुस्थानांतील वैद्यकीय शाळा व कॉलेजें ह्यांसाठी मनुष्याच्या हाडांचे सांगाडे इंग्लंडमधून आणावे लागत, त्यांस प्रत्येकीं ४०० ते ५०० रुपये पडत. आतां हिंदुस्थानाची गरज भागवून, सांगाड्यांची निर्गतहि करणें शक्य झालें आहे. सरकारनें आवश्यक तीं रसायनें मात्र पुरवून सहाय्य केलें पाहिजे.

### मुंबई सरकारचें कर्ज

१५ ऑगस्ट रोजीं विक्रीस काढलेलें ३% व्याजाचें मुंबई सरकारचें कर्ज संध्याकाळपर्यंत पूर्णपणें खपलें न गेल्या कारणानें मुंबई सरकारास ३४४ लक्ष रुपयांचें कर्ज हवें होतें, त्याच्या ८०% रकम जमा झाली व कर्जाची भरपाई करण्यासाठीं २०% रकमेचे कर्जरोखे अंडररायटर्सना द्यावे लागले अशी बातमी प्रसिद्ध झाली होती, ती चुकीची असून ७% पेक्षांहि कमी रकमेचे कर्जरोखे अंडररायटर्सना स्वतः द्यावे लागले, असें आतां अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

### अमेरिकेंत ठेवलेले युद्धकैदी

१,९२,८४६ जर्मन, ५०,२७२ इटालियन व ७३० जपानी असे एकूण २,४३,८४८ युद्धकैदी अमेरिकेमध्यें आहेत.


## मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३३ वी सर्वसाधारण सभा शनिवार दि. २३ सप्टेंबर १९४४ रोजीं दुपारीं २-३० वाजतां ( न. स्टँ. टा. ) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाऊस लेन, कोट, मुंबई ) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

( १ ) ३० जून १९४४ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.
( २ ) नफ्याची वांटणी व डिव्हिडंड ठरविणें.
( ३ ) डिरेक्टरांची निवडणूक करणें.
( ४ ) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,

मुंबई, ता. २६-८-४४.

वैकुंठ ल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

भागांच्या तबदिलीचें काम ( ट्रान्सफर बुकें ) २५ सप्टेंबर ते ७ आक्टोबर १९४४ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.

## मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

### —:खास साधारण सभा:—

जाहीर करण्यांत येतें कीं, धी मुंबई प्रॉ. को. बँक लि. ची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार ता. २३ सप्टेंबर १९४४ रोजीं दुपारीं ३ वाजतां ( न. स्टँ. टाईम ) किंवा बँकेची त्याच दिवशीं भरणारी ३३ वी सर्वसाधारण सभा संपल्याबरोबर ताबडतोब बँकेच्या रजिस्टर्ड ऑफिसांत सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९ बँकहाऊस लेन, कोट, मुंबई, येथें खालील ठरावाचा विचार करण्यास व योग्य वाटल्यास तो मंजूर करण्यास भरणार आहे:—

१. "धी मुंबई प्रॉव्हिन्शिअल को० बँक लिमिटेडचे रु. ५० दर्शनी किंमतीचे भागामध्यें विभागलेलें १५ लाख रुपयांचे भागांचें भांडवल रु. ५० दर्शनी किंमतीचे २०,००० अधिक भाग काढून रु. ५० दर्शनी किंमतीच्या ५०,००० भागांमध्यें विभागून २५ लाख रुपयांपर्यंत वाढवावें. व अशा तऱ्हेनें वाढविलेले भाग सहकारी संस्थांस अगर व्यक्तींस बँकेच्या बोर्डास योग्य वाटतील त्या अटींवर व शर्तींवर दर्शनी किंमतीस अगर अधिक किंमतीस विकतां येतील."

२. वरील ठरावास अनुसरून पोटनियम ३ मध्यें खालील दुरुस्ती करण्यांत यावी :

"पोटनियम ३ ओळ १ मध्यें संख्या "१५" व "३०,०००" चे ऐवजीं अनुक्रमें "२५" व "५०,०००" असें घालावें.

बोर्डाच्या हुकुमावरून

मुंबई, ता. २६ ऑगस्ट १९४४

वैकुंठ ल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... २९० | पडलेल्या बँकांची वर्गवारी— बँकांतील ठेवींमध्यें वाढ— हिंदी अन्न परिस्थितीचा आढावा. | |
| २ रशियांतील सरकारचें संतति संवर्धनास उत्तेजन | ... २९१ | ५ हिंदी गिरण्यासाठीं ब्रिटिश यंत्रसामुग्री ... | ... २९४ |
| ३ पुणें सें. को. बँक | ... २९२ | ६ मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचा अहवाल | ... २९५ |
| ४ स्फुट विचार ... युरोपांतील युद्धाचा शेवट जवळ आला—गेल्या दोन वर्षांतील हिंदी बँकिंग—बंद | ... २९३ | | |

**अर्थ**

बुधवार, ता. १३ सप्टेंबर, १९४४

## रशियांत सरकारचें संतति संवर्धनास उत्तेजन

आक्रमिक युद्धाचें साधन म्हणून जर्मन व इटालियन राज्यकर्त्यांनीं आपल्या देशांत प्रजोत्पत्तीस उत्तेजन देण्याचें धोरण स्वीकारलें होतें. मनुष्यबळाच्या जोरावर साम्राज्यबळ वाढवण्याचा ह्यांत हेतु होता. पश्चिम युरोपांतील देशांत, विशेषें करून फ्रान्समध्यें लोकसंख्या वाढण्याचे ऐवजीं घटत होती आणि ही परिस्थिति चालू राहिल्यास इंग्लंडमध्येंहि हळुहळु तोच प्रकार घडून येण्याची भीति संततीच्या विषयाचे अभ्यासु व्यक्त करीत आले आहेत. रशियामध्यें मात्र संततीचें मान झपाट्यानें वाढत होतें. पूर्वेकडील लोकसंख्येच्या बळानें पश्चिम युरोपांतील संस्कृती व स्वातंत्र्य दडपून टाकण्याचीं दुष्ट स्वप्नें कांहीं लोकांस भेडसावीत होतीं. चालू युद्धांत प्रचंड प्राणहानि झाली आहे, तिचा परिणाम रशियाच्या लोकसंख्येवर काय होईल हें निश्चितपणानें सांगतां येत नाहीं. तथापि, लोकसंख्येंत होणाऱ्या घटीमुळें रशियन राष्ट्र कमजोर झाल्यावांचून रहाणार नाहीं :असें वाटून त्याचे राज्यकर्ते ह्या भावी आपत्तीवर उपाय आतांपासूनच योजूं लागले आहेत. पाश्चात्य देशांतील आधुनिक सुधारणेच्या कल्पना आणि संततीनियमनाच्या तोडग्यांचा उपयोग ह्यांचे योगानें कुटुंबांतील मुलांची संख्या मर्यादित होत आली आहे. कुटुंब व्यवस्था व विवाहसंस्थेचीं बंधनें तिकडे शिथिल झालीं आहेत आणि वैयक्तिक वर्तनाचें स्वातंत्र्य आणि समाज रक्षणाचें कर्तव्य ह्यांचेमध्यें विरोध उत्पन्न झाला आहे.

रशियांत झालेल्या क्रांतीच्या आनुषंगिक तत्वांप्रमाणें पाहिलें असतां कुटुंब व्यवस्था आणि वैवाहिक निर्बंध ह्यांस विशेष महत्व नाहीं आणि घटस्फोटाच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याकडे रशियन पुढाऱ्यांची व कायद्याची प्रवृत्ति होती. नैसर्गिक मार्गानें होणारा संतति विस्तार रशियन लोकसंख्येची वाढ अप्रतिबद्ध राखण्यास समर्थ असल्याचा अनुभव असतांनाहि सध्याच्या युद्धापूर्वीच अनेकपुती मातांस उत्तेजनार्थ द्रव्य सहाय देण्याचें धोरण रशियानें अंगिकारलें होतें. समाजास घटक पुरवणाऱ्या स्त्रियांस सातव्या अपत्यापासून पुढें होणाऱ्या संततीबद्दल वेतन देणारा कायदा १९३६ मध्यें जारी करण्यांत आला होता. बहुपुती स्त्रियांस मिळणारा हा सरकारी तनखा संततिवृद्धीस पुरेसा उत्तेजनकारक नाहीं ह्या समजुतीनें रशियन सरकारनें अलीकडे नवीन हुकूम काढून प्रजावृद्धी बाबतची योजना सुधारली आहे आणि ती अधिक आकर्षक केली आहे. ह्या नवीन नियमाप्रमाणें तिसऱ्या संतानापासून स्त्रियांस तनखा चालू होऊन प्रत्येक मुलामागणिक त्यापुढें त्याची रकम वाढत जावयाची आहे. आयांस सरकारी द्रव्य मिळावयाचें तें दोन प्रकारचें आहे. मूल होतांच एक ठराविक रकम त्यांस दिली जाईल आणि पुढें पांच वर्षांच्या मुदतींत दरमहा त्यांस वेतन मिळेल. १९३६ सालचा नियम आणि अलिकडचा नवीन हुकूम ह्यांस अनुसरून मुलांच्या वाढत्या संख्येबरोबर आयांस मिळावयाच्या वेतनाच्या रकमांमध्यें कशी वाढ व्हावयाची तरतूद आहे हें खालील आकड्यांवरून समजेल:—

बहुसंख्य मुलांच्या आयांस

( आकडे रूबल्सचे ( रशियन चलन ) आहेत )

| | १९३६ | १९४४ |
|---|---|---|
| तिसरें मूल | द्रव्यसहाय नाहीं | ४०० |
| चवथें मूल | ” | ६,१०० |
| पाचवें मूल | ” | ८,९०० |
| सहावें मूल | ” | १०,४०० |
| सातवें मूल | १०,००० | १४,५०० |
| आठवें मूल | १०,००० | १४,५०० |
| नववें मूल | १०,००० | १८,५०० |
| दहावें मूल | १०,००० | १८,५०० |
| अकरावें मूल | १२,००० | २३,००० |

अनेक अपत्यांच्या मातांस ह्याप्रमाणें मोठमोठ्या रकमा दरमहा दिल्या जाणार आहेत, एवढेंच नाहीं तर इतर स्वरूपांतहि त्यांस आणखी उत्तेजन देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. लहान मुलांच्या शिक्षणाची फी कमी केलेली आहे आणि गर्भवती व बाळंत स्त्रियांस गिरण्यांतील वगैरे व्यवसायांत माफी व सवलती मिळत आहेत, त्या वाढवलेल्या आहेत. ह्याशिवाय, “ मातृपदाचें वैभव, ” “ मातृत्व पदक ” व “ शूर मातांचें मंडळ ” ह्या नांवाचीं बहुमान दर्शक पदकेंहि बहाल केलीं जावयाचीं आहेत. हीं पदकें धारण करणाऱ्या स्त्रियांस चांगलें अन्न व वस्त्रें मिळण्याची सवलत आहे आणि त्यांस रांगेंत उभें राहिल्यावांचून रेशन मिळूं शकतें ही केवढी तरी मोठी सोय आहे.

### क्लिअरिंग हाऊसचे आकडे

हिंदुस्थानांत कलकत्ता, मुंबई, मद्रास, कराची, रंगून, कानपूर, लाहोर व दिल्ली येथें बँकर्स क्लिअरिंग हाऊसेस मुख्यतः आहेत त्यांत व इतर ठिकाणच्या क्लिअरिंग हाऊसेसमध्यें मिळून किती रकमेच्या चेक्सची देवघेव झाली, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| वर्ष | चेकची रकम ( लक्ष रुपये ) |
|---|---|
| १९४० | २२,५२,०३ |
| १९४१ | २६,८२,७८ |
| १९४२ | २७,१३,५६ |
| १९४३ | ४२,२८,९२ |

### सर सी. डी. देशमुख परतणार !

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर सी. डी. देशमुख, हे लंडनहून लवकरच परततील, असें दिसतें. त्यांनीं आणखी कांहीं काळ तेथें राहण्यांत इशील नाहीं, असें प्रसिद्ध झालें आहे.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

### १९४३-४४ मधील उपक्रम.

( अहवालाचे सालीं बँकेस निव्वळ नफा रु. ४२,३१२-१-१ झाला आहे त्यांतून भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळणार आहे. )

( १ ) अहवालाचे सालीं ता. २५-३-४४ रोजीं बँकेनें सर परशुरामभाऊ कॉलेजचे आवारांत एक शाखा उघडली. आतां बँकेच्या एकूण नऊ शाखा व उपशाखा अशा आहेत.

( २ ) चालू वर्षांत बँकेच्या विशेष प्रयत्नामुळें १९ नवीन सोसायट्या स्थापन होऊं शकल्या.

( ३ ) नियमित हप्ते देणाऱ्या सोसायट्यांना त्यांनीं मुदतींत केलेल्या परतफेडीच्या रकमांवर शेंकडा ८ आणे दरानें कसर आजवर देण्यांत येत असे ती यंदा १ रुपया दरानें देण्यांत आली आहे. याशिवाय सांपत्तिक स्थिति खालावलेल्या सोसायट्यांना पाईपेक्षां अधिक प्रमाणांत कसर देण्याचें बोर्डानें योजलें आहे.

( ४ ) वेगवेगळ्या शाखा-कचेऱ्यांचे कार्य-क्षेत्रांतील सोसायट्यांचे सभासदांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठीं व त्यावर काय इलाज योजतां येतील याचा विचारविनिमय करण्यासाठीं अहवालाचे सालांत शाखा कचेऱ्यांचे ठिकाणीं सोसायट्यांचे प्रतिनिधींची सभा भरविण्याचा उपक्रम पुन्हा सुरू करण्यांत आला आहे. अशा सभा पुष्कळच उपयुक्त होत आहेत.

( ५ ) युद्धजन्यपरिस्थितीमुळें खेडेगांवांतील गरजू जनतेला दररोजचें लागणारें धान्य विकत मिळण्यास फार त्रास पडूं लागल्यानें, सरकारी धान्य-वाटप करण्याचें काम सरकारनें पसंत केलेल्या वैयक्तिक दुकानदारांऐवजीं स्थानिक सहकारी सोसायट्यांना द्यावें अशी खटपट करण्यांत आली व तिला यश मिळून हें सरकारी धान्य-वाटप करण्याचें काम सरकारनें आपल्या जिल्ह्यांतील ४० सहकारी सोसायट्या व आपल्या बँकेच्या ४ शाखा यांचेकडे सोंपविलें आहे. हें काम करणाऱ्या सहकारी सोसायट्यांस सरकारी धान्य खरेदी करण्यासाठीं बँकेनें भांडवल पुरविण्याचें ठरविलें असून यंदाचे सालीं अशा सोसायट्यांस रु. ३३,००० पर्यंत क्रेडिट मंजूर केलें आहे व सोसायट्या जरुरीप्रमाणें त्याचा उपयोग करून घेत आहेत. खासगी दुकानदारां ऐवजीं सहकारी सोसायट्यांमार्फत धान्य-वाटपाचें काम जास्त व्यवस्थितपणें व पद्धतशीर चालून जनतेमध्यें विश्वास उत्पन्न होतो याची जाणीव उशीरा कां होईना पण सरकारला झाली हें सुचिन्ह आहे. स्थानिक रेव्हेन्यू खात्याची, हल्लीं दाखविली आहे त्याहून थोडी अधिक, सक्रिय सहानुभूति लाभल्यास अडचणींत सांपडलेल्या गरीब जनतेला बँकेस पुष्कळ सहाय्य देतां येईल. या धान्य-वाटपाचे व्यवहारांत नफा मिळविण्याचें धोरण बिलकूल नाहीं हें येथें नमूद करणें अवश्य आहे. स्टँडर्ड क्लॉथची विक्री करण्याची सरकारी परवानगी फक्त इंदापूर शाखेस मिळाल्यानें त्या शाखेनें खुद्द इंदापूर येथें व तालुक्यांतील कांहीं सोसायट्यांचेमार्फत कापड-विक्रीचें काम समाधानकारक रीतीनें केलें. अशी विक्री अहवालाचे सालीं सुमारें रु. ३७,००० पर्यंत झाली आहे.

( ६ ) जिल्ह्यांतील विवक्षित गांवीं घरांचे तारणावर व सोन्याचांदीचे तारणावर गरजू सभासदांना कर्जे देण्याची योजना बँक करीत आहे. याशिवाय विमा-पॉलिसींचे व मुदतीच्या हुंडीचिठ्ठींचे तारणावरही भांडवल पुरविण्याची व्यवस्था बँक करणार आहे.

( ७ ) यंदाचे सालीं बोर्डानें सर्व माजी चेअरमन, व्हाइस-चेअरमन व कांहीं डायरेक्टर्स यांना विचारविनिमयासाठीं ता. ३०-१-४४ रोजीं बँकेंत येण्याबद्दल खास विनंति केली होती. या सभेंत पुष्कळ उपयुक्त चर्चा झाली. जनतेच्या वाढत्या विश्वासानें जमणाऱ्या भांडवलाचा विनियोग सभासदांचे दृष्टीनें अधिक उपयुक्त कसा करितां येईल व सोसायट्यांचे शेतकरी सभासदांना नांगर, खतें, बेणें वगैरेचा पुरवठा मालाच्या रूपानें करून देणें कसें शक्य होईल याबद्दल विचारविनिमय झाला. या दृष्टीनें प्रारंभ करण्यांत आला आहे.

( ८ ) अहवालाचे सालांत बँकेनें इंदापूर तालुक्यांतील एक व पुरंदर तालुक्यांतील एक अशा दोन गांवांची आर्थिक पहाणी केली आहे. शेतीच्या मालास, जमिनीस व इतर उत्पन्नास आलेले चढीचे भाव शेतकऱ्यांस मिळत गेल्यानें त्यांच्या स्थितींत व कर्जबाजारीपणांत कांहीं फरक पडला आहे, किंवा कसें व त्या जादा उत्पन्नाचा त्यांनीं कसा विनियोग केला आहे हें पडताळून पाहणें हा या आर्थिक चौकशीचा मुख्य उद्देश होता.

( ९ ) बँकेस जोडलेल्या सोसायट्यांचे कारभारांत मनःपूर्वक लक्ष घालून तिची सुधारणा व आर्थिक स्थैर्यता वाढविण्यांत ज्यांनीं प्रत्यक्ष खटपट केली अशा सोसायट्यांचे पंच-कमिटीपैकीं एकास किंवा सेक्रेटरीस त्यानें केलेल्या कार्याचा गौरव म्हणून अल्प स्वरूपाचीं पारितोषिकें तालुकानिहाय देण्याचें धोरण बोर्डानें सुरवातीच्या दिवसांत जाहीर केलेलें होतें. त्याला अनुसरून यंदाच्या साधारण सभेंत अशीं पारितोषिकें देण्यांत येतील. या उपक्रमामुळें पंच-कमिटीचें व सेक्रेटरीचें आपापल्या सोसायट्या स्थैर्य करण्याकडे अधिक लक्ष लागेल असा बोर्डास भरवसा आहे.


## दि कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

एका भागीदारानें पुरस्कारलेली, महाराष्ट्रांतील एजंटासाठीं

## वक्षिसाची चढाओढ

चढाओढींत भाग घेऊं इच्छिणारांनीं तावडतोब एजन्सीसाठीं अर्ज करावेत.

● महाराष्ट्रांत सर्वत्र एजंटस नेमणे आहेत. ● माहिती पत्रकांसाठीं भेटा अगर लिहा.

**श्री. म. जोशी**
मॅनेजिंग डायरेक्टर
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स विमा कंपनी लि., पुणें शहर

# स्फुट विचार

## युरोपांतील युद्धाचा शेवट जवळ आला

पश्चिम युरोपांतील आघाडीवर फ्रान्सच्या किनाऱ्याजवळ मित्र राष्ट्रांच्या सैन्यांस शक्य तितका काळ डांबून ठेवावयाचें व उडत्या बाँबच्या आणि टॉर्पेडोंच्या सहाय्यानें त्यांची रसद तोडून त्यांची प्रगति कुंठित करावयाची हा जर्मनीचा बेत सपशेल फसला आहे. जर्मनीच्या कळसूत्री बाँबच्या नव्या हत्यारानें लंडन शहर व दक्षिण इंग्लंड ह्यांत बरीच नासधूस केली, परंतु हें अस्त्र पश्चिम आघाडीवरील युद्धांत निर्णायक होईल आणि त्याच्या सायीस दुसरीहि नवीं हत्यारें उपयोगांत आणलीं जाऊन मित्र राष्ट्रांची नामुश्की केली जाईल ही शत्रूची अपेक्षा व बढाई निष्फळ ठरली आहे. फ्रान्स व बेल्जम ह्या देशांच्या पश्चिम किनाऱ्यावर उभारलेली आपली प्रचंड तटबंदी अभेद्य राहील ही त्याची कल्पनाही फुकट गेली आहे. "युरोपांत पाय तर टाका म्हणजे दाखवतो गम्मत" ह्या अर्थाचे जर्मन प्रचारकांचे दर्पोक्तीचे उद्गार हास्यास्पद झाले आहेत आणि मित्र राष्ट्रांच्या सैन्यास आंत येऊं देण्यांत आमचा कुशल लष्करी डाव आहे ह्या आशयाचीं त्यांचीं सूचक विधानें त्यांच्या गळ्यांत आलीं आहेत. मित्र राष्ट्रांच्या फौजा फ्रान्समध्यें पश्चिम व दक्षिण ह्या दोन्हीं बाजूंनीं शत्रूची लांडगेतोड करीत जर्मन सरहद्दीकडे चालल्या असतां शत्रूस पळतां भुई थोडी झाली आहे. बेल्जममधून शत्रूची हकालपट्टी होऊन मित्र राष्ट्रांचीं सैन्यें हॉलंडमध्यें शिरलीं आहेत. पूर्वेच्या आघाडीवर रुमानिया गेला व बल्गेरियाही हातचा गेला आणि फिन्लंडनें रशियाशीं सूत्र बांधलें. ह्याप्रमाणें जर्मनीचे साथीदार एकामागून एक त्यास सोडून शत्रूचा कोंडमारा त्याच्या स्वतःच्या देशांत होत आहे. त्यानें पादाक्रांत केलेले प्रदेश स्वतंत्र झाले आहेत आणि होत आहेत. त्यामुळें इटलींतहि जर्मन सैन्याची पीछेहाट चालूच आहे. ह्यामुळें त्याचा लढाऊ व अन्नविषयक सामुग्रीचा पुरवठा संपुष्टांत आला आहे. फ्रान्सचीं कांहीं बंदरें थोडें दिवस त्यानें लढवीत ठेवलीं तरी अखेरीस तीं पडणार आणि जर्मनीची नाकेबंदी होणार हें आतां निश्चित आहे. चोहों बाजूंनीं घेरलेल्या हिंस्र श्वापदासारखी जर्मनीची स्थिति झाली आहे आणि त्या श्वापदाप्रमाणें स्वतःच्या सरहद्दीवर व स्वतःच्या देशांत निकरानें लढण्याचा तो प्रयत्न करील तरी त्याचा शेवटचा क्षण जवळ आला आहे ह्यांत संशय नाहीं. स्वतःच्या भोंवतालच्या अंकित देशांवर जर्मनी आजवर चरला, पण आतां त्याची ही चंदी बंद पडली आहे. आणि त्याच्या नखांची तीक्ष्णताहि बोथट झाली आहे. जर्मनीचें नामांकित विमानदळ हतप्रभ झालें आहे आणि शस्त्रास्त्रांचें उत्पादन घटल्यामुळें त्याचें लढाऊ बळ खच्ची झालें आहे. अशा स्थितींत शत्रूनें कांहीं दिवस उसनें अवसान आणलें आणि पिसाटपणानें युद्ध चालू ठेवलें तरी निश्चित व पूर्ण पराभवाचीं दुष्ट स्वप्नें हिटलरला भेडसावीत असलीं पाहिजेत.

---

## गेल्या दोन वर्षांतील हिंदी बँकिंग

हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांतील बँकांसंबंधीं १९४२ व १९४३ सालाबाबत आकडे रिझर्व्ह बँकेनें नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. १९३९ व १९४० सालाबाबत आकडे जुलै १९४१ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आले होते. १९४१ सालाबाबत आकडे जुलै १९४२ मध्यें प्रसिद्ध झाले परंतु कागदाच्या टंचाईमुळें १९४३ मध्यें हें प्रसिद्धीकरण तहकूब ठेवण्यांत आलें होतें. परंतु बँकांकडून व हितसंबंधी लोकांकडून प्रकाशनाबाबत विशेष मागणी आल्याकारणानें १९४२ व १९४३ सालाबाबत आकडे आतां प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. बँकांकडील ठेवींत चलन विस्तारामुळें प्रचंड वाढ, अनेक नव्या बँकांची स्थापना, बँकांच्या शाखांत वाढ व बँकांच्या वसूल भांडवलांत, रोख्यांतील गुंतवणुकींत आणि येणें कर्जांत वाढ, हीं गेल्या दोन वर्षांतील हिंदी बँकिंगचीं वैशिष्ट्यें सांगतां येतील. १६ बँकांस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा नव्यानें प्राप्त झाला व १ बँक शेड्यूलमधून गळाली. अशा रीतीनें १९४३ अखेर शेड्यूल्ड बँकांची संख्या वाढून ७४ झाली. गेल्या दोन वर्षांत ५० नव्या बँका स्थापन झाल्या, ह्यांपैकीं १० बँका शेड्यूल्ड बँकांचे वर्गांत गेल्या. बँकांजवळील रोख रकमांचें एकूण ठेवींशीं प्रमाण पाहिलें, तर तें १९३८ मध्यें १२.९% १९४१ मध्यें १६.९% व १९४३ मध्यें २४.९% होतें, असें आढळतें. सरकारी व इतर रोख्यांतील गुंतवणुकीचें एकूण ठेवींशीं प्रमाण अनुक्रमें ४६.१% चे ४९.९ व ५३.०% झालें. कित्येक बँकांनी वाढलेल्या किंमतीचा फायदा घेऊन आपली स्थावर मालमत्ता विकून टाकली. एकूण ठेवींशी मालमत्तेचें प्रमाण १९४१ सालीं ३.२% होतें तें १९४३ मध्यें १.३% झालें. फक्त शेड्यूल्ड बँकांच्याच शाखा पाहिल्या, तर १९४२ मध्यें ह्यांची संख्या १,४५० होती ती १९४३ मध्यें १,८८२ झाली. हिंदी बँकिंगमध्यें सध्यां दिसून येणारी प्रवृत्ति लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारास कायद्यांत कांहीं सुधारणा सुचविल्या आहेत व आपल्या १९३९ मधील कांहीं मूळ सूचनांत बदलहि केला आहे. बँकांसाठी एका स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करून तो हिंदुस्थानास सादर करण्यांत आला आहे. मध्यवर्ती असेंब्लींत त्यासंबंधांत सरकारी बिल लवकरच येईल, अशी अपेक्षा आहे.

---

## बंद पडलेल्या बँकांची वर्गवारी

१९४२ मध्यें हिंदुस्थानांत एकूण ४८ बँका बुडाल्या अथवा गुंडाळण्यांत आल्या, त्यांचें अधिकृत भांडवल १ कोटि, ८२ लक्ष रुपये व वसूल भांडवल ११ लक्ष, ९६ हजार रुपये होतें. ह्या ४८ बँकांपैकीं ११ बंगालमधील, ७ कोचीनमधील, ११ मद्रासमधील, ६ म्हैसूरमधील व ८ त्रावणकोरमधील होत्या. मुंबई प्रांतांतील सिनेफिनॅन्स अँड बँकिंग कॉर्पोरेशन (अधिकृत भांडवल १ कोटि रुपये, खपलेलें भांडवल ७,७०० रुपये) व सिराटी (अधिकृत व खपलेलें भांडवल प्रत्येकी १०० लक्ष रु.) ह्या दोन संस्था बंद पडल्याचा रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या वार्षिकांत उल्लेख आहे. १९४३ सालीं ५० बँका बंद पडल्या, त्यांचें अधिकृत व वसूल भांडवल अनुक्रमें ३ कोटि, ७३ लक्ष व ६ लक्ष, २८ हजार रुपये होतें. ह्या ५० पैकीं २४ बँका एकट्या बंगालच्या वांटणीस आल्या. अर्थात, त्या सर्वांचें मिळून वसूल भांडवल १ लक्ष, १४ हजार रुपयेच फक्त होतें. मुंबईमध्यें १५-४-१९४३ रोजीं नोंदण्यांत आलेल्या २ कोटि रुपये भांडवलाच्या न्यू कमर्शिअल बँकेनें कार्यास प्रारंभच केला नाहीं. १९४० सालीं १०२ बँका व १९४१ सालीं ७५ बँका बंद पडल्या होत्या, त्या दृष्टीनें गेलीं दोन वर्षें बँकांना चांगलीं गेलीं, असेंच वरील आकडे दर्शवितात.

---

### बँकांतील ठेवींमध्यें वाढ

हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या प्रकारच्या बँकांकडील ठेवींचे आकडे खालीं दिले आहेत, त्यावरून एक्सचेंज बँकांचें महत्त्व अद्याप किती आहे, हें समजून येईल. त्याचप्रमाणें देशभर पसरलेल्या सहकारी बँकांच्या वाढीस अद्याप किती वाव आहे, हेंहि लक्षांत येईल.

( आकडे लक्ष रुपयांचे )

| | १९३८ ( युद्धपूर्व वर्ष ) | १९४१ | १९४२ | १९४३ |
|---|---|---|---|---|
| इंपिरिअल बँक. | ८१,५१ | १०८,९२ | १६३,४९ | २१४,५३ |
| एक्सचेंज बँका | ६७,२० | १०६,७३ | ११६,८५ | १४०,१९ |
| इतर शेडयूल्ड बँका | ९१,८७ | १२५,०४ | १८९,३४ | ३१९,६५ |
| १ लाखावरील भांडवलाच्या व रिझर्व्हच्या बिगर शेडयूल्ड बँका | १४,९४ | २०,०५ | २९,०१ | ४०,२३ |
| सहकारी बँका | ३५,५३ | ३८,१८ | ४४,०५ | ४७,९५ |
| पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज ठेवी, कॅश सर्टिफिकिटें डि. से. सर्टिफिकिटें | १४०,२८ | १०२,२६ | ९०,२६ | १०८,०१ |
| एकूण | ४२१,०२ | ५०५,१८ | ६३२,९७ | ८७०,५६ |

युद्धापूर्वीच्या मानानें १९४३ सालीं इंपीरिअल बँकेंतील ठेवी १६३.२% वाढल्या व एक्सचेंज बँकांचे ठेवींत १०८.६% ची भर पडली. इतर शेडयूल्ड बँकांस सर्वांत अधिक प्रमाणांत ( २४७.९% ) ठेवी मिळाल्या. बिगर शेडयूल्ड बँकांचे व सहकारी बँकांचे ठेवींत अनुक्रमें १६९.३% व ३६.१% वाढ झाली. पोस्ट ऑफिसांतील ठेवी, कॅश सर्टिफिकिटें, वगैरेंतील गुंतवणूक १९४२ सालीं ९०½ कोटि रुपयांवर आली ती १९४३ मध्यें १०८ कोटि रुपये झाली तरी सुद्धां १९३८ चे मानानें हा आकडा २३% नें कमीच भरला.

---

### हिंदी अन्न परिस्थितीचा आढावा

हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वाला प्रसाद, ह्यांनीं मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरमध्यें हिंदी अन्न परिस्थिति नुकतीच निवेदन केली. हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याची परिस्थिति आतां अगदींच कांहीं असमाधानकारक नाहीं असें ते म्हणाले. १९४१–४२ पूर्वी पांच वर्षांत मुंबई प्रांतानें जेवढ्या धान्याची दरसाल सरासरीनें आयात केली, ह्यापेक्षां अधिक धान्याची १९४३–४४ मध्यें मुंबईची वाटणी आहे, असें त्यांनीं सांगितलें. गेल्या वर्षांत परिस्थिति बरीच सुधारली आहे, तथापि कांहीं विभागांत अद्याप धान्याचा तुटवडा आहे, आणि तो दूर करण्याकरितां प्रांतिक सरकारांस हिंदुस्थान सरकार मदत करीत आहे, असा त्यांनीं खुलासा केला. बंगालमधील परिस्थिति गेल्या दोन महिन्यांत बरीच सुधारली असल्याचें ते म्हणाले. अंतर्गत पुरवठ्याची इकडून–तिकडे वहातुक करूनच केवळ भागणार नाहीं, आयातीचा प्रश्न हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे, हें त्यांनीं मान्य केलें. ग्रेगरी समितीच्या शिफारसी पाळण्याविषयीं अन्नमंत्रि ब्रिटिश सरकारामागें तगादा लावीत आहेत. युद्ध लवकर संपून आगबोटी उपलब्ध होतील व धान्याची व्यवस्थेशीर आयात लागलीच होऊं लागेल, अशी आशा अन्नमंत्र्यांनीं व्यक्त केली.


" मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदवत्त्या

(ABC)

BUG COILS ( ABC )

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

## मुंबई प्रांताचा शेतकी खात्याचा १९४२ चा अहवाल

या वार्षीत पुणें येथील ॲग्रिकल्चरल कॉलेजच्या कार्याची माहिती देण्यांत आली आहे. हें कॉलेज स्थापन होऊन आज ३४ वर्षे झाली असुन या कॉलेजांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अहवालाचे सालीं २०८ होती. यापैकीं ७२ विद्यार्थी शेवटच्या बी. एससी. ( ॲग्रि. ) या परीक्षेस बसले होते व त्यांपैकीं ५२ विद्यार्थी यशस्वी झाले. १४ पदवीधर विद्यार्थी शेतकी-संबंधीं अर्थशास्त्र, वनस्पतिशास्त्र व वनस्पतिनिदानशास्त्र यासंबंधींचें शिक्षण घेत होते. पिकांची पैदास, गुराढोरांची जोपासना व डेअरी, शेतकीसंबंधीं रसायनशास्त्र वगैरेसंबंधींचे खास अभ्यास-क्रमासाठीं ११ विद्यार्थी होते. खास फॉरेस्ट रेंजर्सच्या कोर्ससाठीं या कोर्सचें सध्या चौथें वर्ष चालू आहे—१० विद्यार्थी होते. रिपोर्टाच्या वर्षांत कॉलेजमध्यें सामाजिक व व्यायामविषयक चळवळी नेहमीप्रमाणें चालू होत्या.

पश्चिम खानदेश जिल्ह्यांत धुळें येथें एक व धारवाड जिल्ह्यां-तील देवीहोसूर येथें दुसरें अशीं दोन डिस्ट्रिक्ट ॲग्रिकल्चरल स्कूल्स मुंबई प्रांतांत आहेत. धुळें येथील शाळेंत ४० विद्यार्थी शिक्षण घेत होते व देवीहोसूर येथें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २९ होती. या संस्थांचें कार्य विशेषेंकरून व्यावहारिक असुन त्या ज्या प्रदेशांत स्थापण्यांत आल्या त्या प्रदेशांत त्यांचें कार्य विशेष पसंत पडलें आहे.

रूरल ॲसिस्टंटांना शेती, सहकार्य व ग्रामोद्योग यासंबंधींचें शिक्षण देण्यासाठीं मांजरी, धुळें, देवीहोसूर भडोच व बोर्डी या पांच ठिकाणीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. रिपोर्टाच्या वर्षी १२८ रूरल ॲसिस्टंट्स या केंद्रांतून शिक्षण घेऊन बाहेर पडले, व त्यांपैकीं बहुतेकांस सध्यां ग्रामसुधारणेच्या कार्याशीं संबंध असलेल्या अनेक सरकारी खात्यांत काम मिळालें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर या ठिकाणीं कोकणांतील विद्यार्थ्यां-साठीं एक नवीन शिक्षण—केंद्र उघडण्यांत आलें आहे.

बागाईत कामासंबंधीं व कोंबड्यांची जोपासना करण्यासंबं-धींच्या खास अभ्यासक्रमाचा वर्ग पुणें येथें चालविण्यांत आले असुन त्यांत अनुक्रमें ४० व ५६ विद्यार्थी होते.


गेले तीन दिवस शेंकडो लोक
तिकिटांचे अभावीं परत गेले !

९ वा आठवडा !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

कथा:- स. अ. शुक्ल

-भक्तीचा मळा-

दिग्दर्शक : केशवराव दाते · [ माली ] प्रोड्युसर : व्ही. शांताराम

भूमिका:—
मा. कृष्णराव, बेबी नलिनी, अमीर कर्नाटकी

—डेक्कन—

दररोज ७ व १० वाजतां
दर शनि. रवि. सोम. जादा खेळ दुपारीं ४ वाजतां
सर्व खेळ मराठी " भक्तीचा मळा "
रिझर्व्हेशन शनि. व रवि. सकाळीं १० ते १२
फ्री व कॉम्प्लिमेंटरी पासेस अजिबात बंद !



This is not a prospectus but merely an advertisement.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

दि भारत इंडस्ट्रिअल बँक, लि.

हेड ऑफिस:—पुणें शहर

शाखा:—

( १ ) पुणें कॅन्टोन्मेंट ( २ ) बारामती ( ३ ) लोणावळा
पे ऑफिस—खोपोली ( जि. कुलाबा )

एकूण खेळतें भांडवल २४ लाखांचे वर

—संचालक मंडळ—

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, अध्यक्ष | श्री. व्ही. व्ही. वर्तक, उपाध्यक्ष |
| ,, डी. डी. देशपांडे | श्री. बी. पी. केळकर |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | शेट बाडीलाल साकळचंद |
| आमदार बी. बी. साळवेकर | श्री. बी. बी. भागेकर |
| सौ. इन्दुमतीबाई करडे | ,, एम. एन. परांजपे |
| श्री. के. बी. साळवेकर | ,, के. पी. जोशी |

■ बँकेच्या दर्शनी किंमत रु. ५,१८,०५० चे ऑर्डिनरी शेअर्सची विक्री करावयास परवानगी मिळाली आहे.

■ प्रत्येक ऑर्डिनरी शेअर रु. ५० चा असून त्यापैकीं तूर्त रु. २५ भरावयाचे आहेत. बाकीची रक्कम रिझर्व्ह लायबिलिटी म्हणून शेअर होल्डरकडेच राहणार आहे.

■ अर्जांबरोबर प्रत्येक शेअर मागें रु. १५ व अर्ज मंजुरी-नंतर रु. १० याप्रमाणें पैसे भरावयाचे आहेत.

■ बँकेनें मतवर्षी ४ टक्केप्रमाणें ऑर्डिनरी शेअर्सवर डिव्हिडंड वाटलें आहे.

■ शेअर्स घेऊं इच्छिणाऱ्यांनीं शेअर अर्जाचा नमुना मागवावा.

■ इतर माहिती बँकेचे हेड ऑफिस अगर ब्रँचेसमध्यें समक्ष मिळेल.

( लवकरच बँकेची एक शाखा बेलापूर रोड येथें चालू होणार आहे )

रा. बा. साळवेकर, B. A. LL. B.
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
( सहाय खात्यानें मान्यता दिलेले )

**टोमॅटो केचप ( गोड ) व**
**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**
बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
**मै ला चा — द ग ड**
सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

**दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.**
( स्थापना: १९१९ )
आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
**सर होमी मेहता,** के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा:
**मोति माणिक मॅन्शन,**
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस:
**मेहता हाऊस,**
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.